१५) प्रधान सचिव (बांधकाम(, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय तथा सदस्य शक्ती प्रदान समिती,

१६) सर्व विभागीय आयुक्त,

१७) सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई,

१८) १८. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे,

१९) महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा परिक्षालेखा/ व अनुज्ञेयता(,

२०) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षालेखा/ व अनुज्ञेयता(,

२१) सर्व जिल्हाधिकारी,

२२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

२३) सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,

२४) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई,

२५) अतिरिक्त संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई,

२६) विशेष संनियंत्रण कक्ष (जलस्वराज्य-२), म.प्रा.जी., भू.यं.वि.स. आणि सार्वजनिक आरोग्य विभाग,

२७) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई

२८) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, (सर्व(

२९) २८.जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व(

३०) सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,

३१) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व(

३२) सर्व प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,

३३) सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,

३४) सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,

३५) सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,

३६) सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/ पाणी व स्वच्छता( जिल्हा परिषद,

३७) सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती,

३८) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने,

३९) मंत्रालयातील सर्व विभाग,

४०) निवड नस्ती, पा-.पु.११

## परिशिष्ट - १

## कार्यक्रमाचे घटक

### अ) मुख्य भौतिक गुंतवणूक (Major Physical Investments)

(दशलक्ष डॉलर्स)

| अ.क्र | तपशील | भौतिक लक्ष्य | तरतूद |
|---|---|---|---|
| १ | निम शहरी भागांमध्ये सुधारित दर्जाने पाणी पुरवठा व इतर सेवा पुरविणे | ३९ ग्रामपंचायती | ११२.३३ |
| २ | अति उपसा झालेल्या (Over Exploited) पाणलोटांमध्ये जलधर (Aquifer) पाणी व्यवस्थापन प्रकल्प राबविणे | ३० जलधर | १९.५९ |
| ३ | पाणी गुणवत्ता बाधित(Water Quality Affected) वस्त्यांसाठी उपाययोजना | ३३० वस्त्या | १७.२८ |
| ४ | पाणी टंचाई असलेल्या भागांमध्ये पाऊस पाणी संकलन व्यवस्था (Rainwater Harvesting System) | २५० वस्त्या | २०.१० |
| | एकूण | | १६९.३० |

### ब) इतर भौतिक गुंतवणूक (Other Physical Investments)

(दशलक्ष डॉलर्स)

| अ.क्र | तपशील | तरतूद |
|---|---|---|
| १ | सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांचे बळकटीकरण करणे<br>(उप विभागीय स्तर १३८, जिल्हा स्तर २९ व राज्यस्तरावरील सभागृह अशा एकूण १६८) | ४.१० |
| २ | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचा पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांचे बळकटीकरण करणे<br>(प्रत्येक विभाग निहाय ०१ या प्रमाणे एकूण ०६) | १.९५ |
| ३ | महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्थेस (MEETRA) पाणी व स्वच्छता क्षेत्रातील उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) म्हणून विकसित करणे. | १०.४५ |
| ४ | ग्रामीण पाणीपुरवठा उप विभागीय कार्यालयांमध्ये सोयी सुविधा विकसित करणे | २.०६ |
| | एकूण | १८.५६ |

(पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. जस्वप्र-१२१३/प्र.क्र.२००/पापु-११, दिनांक ०४/०१/२०१४ चे जोडपत्र)

## परिशिष्ट - १

## कार्यक्रमाचे घटक

### क) मृदू घटकांसाठीची गुंतवणूक (Software Investments)

(दशलक्ष डॉलर्स)

| अ. क्र | तपशील | तरतूद |
|---|---|---|
| १ | सर्व स्तरावरील प्रकल्प भागीदारांची क्षमता बांधणी | १.७५ |
| २ | माहिती, शिक्षण आणि संवाद (IEC) | २.३७ |
| ३ | कार्यक्रमाचे संनियंत्रण व मूल्यमापन | १.३८ |
| ४ | कार्यक्रम व्यवस्थापन | ३०.३३ |
| ५ | भूसवियं अंतर्गत निरिक्षण विहिरी, पर्जन्यमापन केंद्रे इ. चे बळकटीकरण | ३.१७ |
| ६ | इतर (सर्वेक्षण, मूल्यमापन, संशोधन अभ्यास, स्वायत्त तपासणी यंत्रणाची (IVA) नेमणूक इ.) | ८.१४ |
| | **एकूण** | **४७.१४** |
| | **एकूण अ + ब + क (१६९.३०+१८.५६+४७.१४)** | **२३५.००** |

**टिप** :- कार्यक्रमाच्या एकूण वित्तीय मर्यादेच्या अधीन राहून घटकांतर्गत वित्तीय तरतूद तसेच लोकसंख्या, भौगेलिक परिस्थिती व अंदाजपत्रकानुसार भौतिक उद्दिष्टे बदलण्याचे अधिकार प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना राहतील.

## परिशिष्ट २

(अ) कार्यक्रम अंमलबजावणीसाठी पदे

| अ.क्र. | अंमलबजावणी यंत्रणेचे नाव | आवश्यक पदसंख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रतिनियुक्तीने भरावयाची पदे | कंत्राटी पध्द्तीने भरावयाची पदे | एकूण |
| १ | सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (RSPMU) | १६ | २० | ३६ |
| २ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मधील विशेष संनियंत्रण कक्ष | ५ | २ | ७ |
| ३ | भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, मधील विशेष संनियंत्रण कक्षामधील | २ | ३ | ५ |
| ४ | सार्वजनिक आरोग्य विभाग (सा.आ.प्रयोगशाळा) मधील विशेष संनियंत्रण कक्ष | ० | २ | २ |
| ५ | विभागीय समन्वय व संनियंत्रण कक्ष (विभागीय आयुक्त कार्यालय) | ६ | ६ | १२ |
| ६ | जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामधील जलस्वराज्य-२ कार्यक्रम अंमलबजावणी १२ जिल्हयांसाठी आवश्यक पदे | ० | १२ | १२ |
| ७ | जलस्वराज्य-२ मध्ये निवडण्यात आलेल्या निम शहरी ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसेवकांसाठी सहाय्यकाची पदे | ० | ६० | ६० |
| ८ | भू.स.वि.यं., जिल्हा कार्यालयांसाठी जलधर व्यवस्थापन घटक राबविण्यासाठी करिता आवश्यक पदे | १४ | २१ | ३५ |
| | एकूण | ४३ | १२६ | १६९ |

(ब) क्षेत्रीय संस्थांच्या बळकटीकरणासाठी पदे

| अ.क्र. | क्षेत्रीय संस्था | आवश्यक पदसंख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रतिनियुक्तीने भरावयाची पदे | कंत्राटी पध्द्तीने भरावयाची पदे | एकूण |
| १ | राज्यस्तरीय पाणी व स्वच्छता सहाय संस्थेच्या बळकटीकरणासाठीची पदे/राज्यस्तर | २ | ४ | ६ |
| २ | जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या बळकटी करणासाठीची पदे/जिल्हास्तर (३३ जिल्हे ५ पदे प्रति जिल्हा) | १३२ | ३३ | १६५ |
| ३ | गट संसाधन केंद्राच्या बळकटीकरणासाठी पदे / ग्रामीण पाणी पुरवठा उप विभागस्तर (१७३ X २ पदे) | ० | ३४६ | ३४६ |
| | एकूण | १३४ | ३८३ | ५१७ |

**एकूण पदे (अ + ब) - १६९ +५१७ = ६८६**

(पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. जस्वप्र-१२१३/प्र.क्र.२००/पापु-११, दिनांक ०४/०१/२०१४ चे जोडपत्र)

## परिशिष्ट - ३

## उद्दीष्टपूर्ती आधारित निधी संवितरण निर्देशके /Disbursement Linked Indicators (DLIs)

| DLI | तपशील | % |
|---|---|---|
| DLI#१ | Strengthened M&E system for the sector<br>क्षेत्रासाठी संनियंत्रण व मूल्यमापन प्रणालीचे बळकटीकरण | २१% |
| DLI#२ | Strengthened capacity of key sector institutions<br>महत्वाच्या क्षेत्रीय संस्थांची क्षमता बांधणी | २२% |
| DLI#३ | No. of household connections to a commissioned water supply system<br>पाणी पुरवठा सुरु असलेल्या योजनांना घरगुती नळ जोडण्यांची संख्या | २४% |
| DLI#४ | No. of households connected to a sustainable water supply system and receiving regular water service<br>शाश्वत व नियमित पाणी पुरवठा सेवा मधुन नळ जोडणी दिलेल्या घरांची | १५% |
| DLI#५ | Number of Community safe and secure water systems<br>सुरक्षित व संरक्षित पाणी पुरवठा व्यवस्थांची संख्या | १८% |
| | Total / एकूण | १००% |

**राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी**
**हागणदारी मुक्तीचे सुधारित धोरण**

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
## शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११३/प्र.क्र.१५६/पापु-०७

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल प्रशासकीय इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: २२ जानेवारी, २०१४

**वाचा**

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापापु-१००५/प्र.क्र.७४(२)/पापु-०७, दिनांक ०२ मे, २००५
२) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापायो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दिनांक १७ मार्च, २०१०
३) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-११११/प्र.क्र.२०३/पापु-०७, दिनांक २१ डिसेंबर, २०११
४) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१५४/पापु-०७, दिनांक १४ सप्टेंबर, २०१२
५) **शासन परिपत्रक क्रमांकः** ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१६०/पापु-०७ दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१२
६) **शासन परिपत्रक क्रमांकः** ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१६०/पापु-०७, दिनांक १५ जानेवारी, २०१३
७) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११३/प्र.क्र.१०३/पापु-०७, दिनांक ०६ जून, २०१३
८) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११३/प्र.क्र.१३०/पापु-०७, दिनांक १५ जुलै, २०१३

**प्रस्तावना**

राज्यातील ग्रामीण भागांमध्ये उघड्यावर शौचास बसण्याच्या सामान्य जनतेच्या सवयींमध्ये जाणीवपुर्वक बदल व्हावा, गावांमध्ये स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण निर्माण व्हावे, त्याहीपेक्षा स्त्रीयांचा सन्मान राखला जावा यादृष्टीने दिनांक ०२ मे,२००५ पासून राज्यात ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीचे धोरण स्विकारण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी प्रस्ताव तयार करताना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असणे व प्रगतीपथावरील योजनांना शासन हिश्याचा दुसरा हप्ता वितरीत करतांना संबंधित गाव १०० टक्के हागणदारी मुक्त असणे या दोन्ही अटी विहित करण्यात आलेल्या आहेत. मात्र या अटींची काही गावात पुर्तता होत नसल्याने ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर विपरीत परिणाम होत असून योजनांकरीता निधी वितरीत करण्यास व योजना विहित कालावधीत पूर्ण होण्यास अडचणी निर्माण होत आहेत. तसेच ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या एकंदर आर्थिक व भौतिक प्रगतीवर देखील याच विपरीत परिणाम होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास येत आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी विहित केलेली हागणदारी मुक्तीची अट राज्यातील टंचाईसदृश्य/दुष्काळसदृश्य परिस्थिती, ५० पैसेपेक्षा कमी आणेवारी इत्यादी कारणांमुळे संदर्भाधिन क्र.३ ते ८ येथील शासन निर्णय/परिपत्रकांन्वये वेळोवेळी शिथील करण्यात आली होती.

सन २००३-२००४ पासून केंद्र शासनाने संपूर्ण स्वच्छता अभियान सुरु केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेचे जीवनमान उंचावणे कामी महत्वाचा घटक असलेल्या वैयक्तीक शौचालय बांधकामास प्राधान्य देण्यात आले आहे. या अभियानाचे दिनांक ०१ एप्रिल,२०१२ पासून निर्मल भारत अभियान असे नामकरण करण्यात आले आहे. जनगणना २०११ नुसार महाराष्ट्रातील ग्रामीण कुटूंबांची संख्या १३०.१७ लक्ष असून यापैकी वैयक्तीक शौचालय घराच्या परिसरात असलेल्या ग्रामीण कुटूंबांची संख्या फक्त ४९.४६ लक्ष तर खुल्यास शौचास जाणाऱ्या ग्रामीण कुटूंबांची संख्या ७२.६३ लक्ष आहे. केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत उपलब्ध असलेली माहिती व जनगणना २०११ मध्ये उपलब्ध असलेली माहिती यामध्ये तफावत आढळून आल्याने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात २७,९०२ ग्राम पंचायतीमध्ये निर्मल भारत अभियानांतर्गत पायाभुत सर्वेक्षण करण्यात आले. या पायाभुत सर्वेक्षणानुसार एकूण ग्रामीण कुटूंब संख्या १२५.२४ लक्ष असून यापैकी शौचालय असलेली कुटूंब संख्या ६०.३२ लक्ष तर शौचालय नसलेली कुटूंब संख्या ६४.९२ लक्ष असल्याचे दिसून आले आहे.

जनगणना २०११ व पायाभुत सर्वेक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या माहितीवरुन ग्रामीण भागामध्ये वैयक्तीक शौचालय बांधकामाबाबत उदासिनता असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वैयक्तीक शौचालय बांधकाम व वापरास अधिक गती देणे आवश्यक असल्याने ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरीता हागणदारी मुक्तीची अट पुर्णपणे काढून टाकणे संयुक्तीक ठरणार नाही. यासाठी संतुलीत दृष्टीकोन स्विकारणे गरजेचे आहे. त्यामुळे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरीता असलेल्या हागणदारी मुक्तीच्या अटीचा हेतू विचारात घेता तसेच निर्मल ग्राम योजनेत महाराष्ट्र राज्याची प्रगती पाहता हागणदारी मुक्तीची अट पुर्णत: शिथील करण्याऐवजी त्यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

प्रस्तावनेत नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेवून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी यापुर्वी असलेल्या हागणदारी मुक्तीच्या धोरणात बदल करुन पुढीलप्रमाणे हागणदारी मुक्तीचे सुधारीत धोरण अवलंबिण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे

| अ.क्र. | बाब | निधी वितरीत करण्यासाठी हागणदारी मुक्तीची सुधारीत अट |
|---|---|---|
| १ | योजनेचा प्रस्ताव तयार करतांना | संबंधित गावाने सन २०१२ मध्ये निर्मल भारत अभियानांतर्गत झालेल्या पायाभुत सर्वेक्षणानुसार (Baseline Survey) शौचालय असलेल्या कुटूंब संख्येमध्ये २५ टक्के वाढ करणे अथवा एकूण कुटूंब संख्येच्या ६० टक्के हागणदारी मुक्त असणे यापैकी जी कमी असेल ती. |

| अ.क्र. | बाब | निधी वितरीत करण्यासाठी हागणदारी मुक्तीची सुधारीत अट |
|---|---|---|
| २ | योजनेस शासन निधीचा पहिला हप्ता वितरीत करतांना | योजनेचा प्रस्ताव तयार करण्यासाठी वर नमुद केलेल्या अटीच्या अधीन राहून पहिला हप्ता वितरीत करण्यात यावा. |
| ३ | योजनेस शासन निधीचा दुसरा हप्ता वितरीत करतांना | संबंधित गावाने सन २०१२ मध्ये निर्मल भारत अभियानांतर्गत झालेल्या पायाभुत सर्वेक्षणानुसार (Baseline Survey) शौचालय असलेल्या कुटूंब संख्येमध्ये ५० टक्के वाढ करणे अथवा एकूण कुटूंब संख्येच्या ७० टक्के हागणदारी मुक्त असणे यापैकी जी कमी असेल ती. |
| ४ | योजनेस शासन निधीचा तिसरा हप्ता वितरीत करतांना | संबंधित गावाने सन २०१२ मध्ये निर्मल भारत अभियानांतर्गत झालेल्या पायाभुत सर्वेक्षणानुसार (Baseline Survey) शौचालय असलेल्या कुटूंब संख्येमध्ये ७५ टक्के वाढ करणे अथवा एकूण कुटूंब संख्येच्या ८० टक्के हागणदारी मुक्त असणे यापैकी जी कमी असेल ती. |
| ५ | योजनेस शासनाचा अंतिम १० टक्के निधी वितरीत करतांना | संबंधित गावाने सन २०१२ मध्ये निर्मल भारत अभियानांतर्गत झालेल्या पायाभुत सर्वेक्षणानुसार (Baseline Survey) शौचालय असलेल्या कुटूंब संख्येमध्ये १०० टक्के वाढ करणे अथवा एकूण कुटूंब संख्येच्या ९० टक्के हागणदारी मुक्त असणे यापैकी जी कमी असेल ती. |

संदर्भाधिन शासन निर्णय क्र. २ मधील परिच्छेद क्रमांक ७.३ ब मध्ये हागणदारी मुक्तीसाठी नमुद केलेली अट या शासन निर्णयान्वये अधिक्रमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201401221258227328 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NIKAM CHETAN B

Digitally signed by NIKAM CHETAN B
DN: CN = NIKAM CHETAN B, C = IN, S = Maharashtra, O = Govt. of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation Department
Date: 2014.01.22 13:19:56 +05'30'

(चेतन निकम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.विधीमंडळ सदस्य (सर्व), विधानभवन, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१०.विभागीय आयुक्त (सर्व),
११.संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१२.जिल्हाधिकारी (सर्व),
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व),
१४.संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे.
१५.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापुर, नवी मुंबई.
१६.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),
१७.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),
१८. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१९. अधिक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण/भारत निर्माण कक्ष
२०. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषदा (सर्व),
२१. मंत्रालयीन सर्व विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालये
२२. पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी/सर्व कार्यासने
२३. निवड नस्ती (कार्यासन पापु-०७)

**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी नेमण्यात येणा-या कंत्राटी अभियंत्यांच्या मानधनामध्ये वाढ करणे त्याचप्रमाणे त्यांच्या सेवाशर्ती निश्चित करणे**

**महाराष्ट्र शासन**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१६७/पापु-०७**

गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,

मंत्रालय, मुंबई- ४०० ००१

तारीख: ०४ जून, २०१४

**वाचा :**

**शासन परिपत्रक क्रमांकः** पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग परिपत्रक क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.११५/पापु-०७, दिनांक ०९ सप्टेंबर, २००९.

**प्रस्तावना :**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत महाजल (किमान गरजा कार्यक्रम), राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) व सर्व बाह्य अर्थसहाय्यित प्रकल्पांतर्गत (जलस्वराज्य प्रकल्पासह) राबविण्यात येणा-या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी तांत्रिक सेवा पुरवठादारांऐवजी करार पद्धतीने कंत्राटी कनिष्ठ आभियंत्यांच्या सेवा घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयान्वये या कनिष्ठ कंत्राटी अभियंत्यांची नियुक्ती प्रक्रिया, मानधन इत्यादी बाबी निश्चित करण्यात आलेल्या आहेत

राज्यात सध्या शासनाच्या अनेक विभागांमार्फत क्षेत्रीय स्तरावर योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी कंत्राटी अभियंते/ सल्लागार नेमण्यात येतात. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी अभियंत्यांना इतर योजनांमधील कंत्राटी कर्मच्या-यांना मिळणा-या एकत्रित मानधनापेक्षा कमी मानधन मिळत असल्याचे व त्यामुळे ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेले अनेक कंत्राटी अभियंते या सेवा सोडून अन्य विभागांकडे वळत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. ही बाब ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रगतीच्या दृष्टीने योग्य नाही. त्यामुळे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी अभियंत्यांच्या एकत्रित मासिक मानधनात इतर योजनांमधील कंत्राटी कर्मच्या-यांना मिळणा-या एकत्रित मासिक मानधनाशी सुसंगत अशी वाढ करण्याची तसेच त्यांच्या सेवाशर्तीत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

## शासन निर्णय :

प्रस्तावनेत नमूद केलेली माहिती विचारात घेता ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत (राज्य, केंद्र व बाह्य अर्थसहाय्यितसह सर्व) राबविण्यात येणा-या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अमंलबजावणीसाठी नेमण्यात येणा-या कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांचे मानधन व इतर सेवाशर्ती याबाबत शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे

१) **कंत्राटी अभियंत्यांची आवश्यकता पडताळून पाहणे :** सर्व जिल्हा परिषदांच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागांनी प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरवातीस जिल्हयांमध्ये चालू असलेल्या व नव्याने घ्यावयाच्या ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांचा वार्षिक कृती आराखडा विचारात घेऊन कंत्राटी पद्धतीने कनिष्ठ अभियंत्यांची नेमणूक करण्याची आवश्यकता आहे किंवा कसे ते पडताळून पहावे. कंत्राटी अभियंत्यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्यास कामाच्या व्यापाच्या प्रमाणात म्हणजेच कामे चालू असलेल्या ५ ग्रामपंचायतींकरिता किंवा रु.२.०० कोटीपर्यंच्या कामांसाठी १ याप्रमाणात कनिष्ठ अंभियंत्यांच्या सेवा ११ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करुन घ्याव्यात

२) **शैक्षणिक अर्हता, मासिक मानधन व इतर भत्ते :**

| पदनाम | शैक्षणिक अर्हता | मानधन | इतर भत्ते |
|---|---|---|---|
| कनिष्ठ अभियंता (कंत्राटी) | स्थापत्य अभियांत्रिकी पदविका धारक | रु.२०,०००/- | १) इंटरनेट व मोबाईल भत्ता- रु.१०००/-<br>२) प्रवास व दैनंदिन भत्ता- नियमित कनिष्ठ अभियंत्यांना अनुज्ञेय असलेल्या दराने |
| | स्थापत्य अभियांत्रिकी पदवी धारक | रु.२२,०००/- | वरीलप्रमाणे |

३) **सुधारित मानधनः-** वरिलप्रमाणे सुधारीत मानधन या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू होईल. यासाठी सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी त्यांच्या जिल्ह्याच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील कंत्राटी अभियंत्यांचा करार कालावधी संपुष्टात आणावा व परिच्छेद १) मधील तरतुदीची पूर्तता होत असेल तरच कंत्राटी अभियंत्यांच्या कामाचे मुल्यमापन करुन ते समाधानकारक असल्यास सुधारित मानधन देण्याचा अथवा त्यांच्या ऐवजी नविन नियुक्ती करण्याचा निर्णय घ्यावा.

४) **वार्षिक मानधन वाढ :** वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सुधारित मानधन लागू केल्यानंतर कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांना १२ महिन्यांचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर मानधनात ८ टक्के वार्षिक मानधन वाढ अनुज्ञेय राहील.

५) **निवड समिती :** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली सध्या कार्यरत असलेल्या कार्यकारी समितीस या कनिष्ठ अभियंत्यांच्या सेवा कंत्राटी पध्दतीने घेण्याचे अधिकार राहतील.

६) **जाहिरात :** कंत्राटी अभियंत्यांच्या पदांसाठी उमेदवारांची निवड करण्याकरिता जिल्हा स्तरावरुन सर्वाधिक खपाच्या एक मराठी व एक इंग्रजी दैनिक वृत्तपत्रात संक्षिप्त जाहिरात द्यावी. तसेच जिल्ह्याच्या वेबसाईटवर देखील जाहीरात प्रसिध्द करण्यात यावी. या जाहिरातीस अनुसरून उमेदवारांनी त्यांचे अर्ज विहित नमुन्यात (जोडपत्र-**१** प्रमाणे) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

७) **निवड प्रक्रिया :** कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांची निवड करताना **जोडपत्र-२** मध्ये दर्शविल्यानुसार गुणदान पद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

८) **पुनर्नियुक्ती :** कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या अभियंत्यांचा करार कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्यांच्या कामाचे मुल्यमापन करुन, एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन, त्यांना पुनर्नियुक्ती देण्याचा अथवा त्यांच्याऐवजी नविन कंत्राटी अभियंते नियुक्त करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना राहील. तसेच या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करावयाच्या कंत्राटी अभियंत्यांना वरिलप्रमाणे सुधारीत मानधन लागू करण्यात येत असल्यामुळे यापुर्वी अल्प मानधनामुळे या कार्यक्रमाकरीता पुरेशा क्षमतेचे अभियंते उपलब्ध झाले नसल्यास सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी अभियंत्यांच्या क्षमतेचे मुल्यामापन करुन त्यांच्या ऐवजी नवीन अभियंते नियुक्त करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना राहील. त्यासाठी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांनी मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे प्रस्ताव सादर करावा.

९) **करारनामा / बंधपत्र :** ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त / पुनर्नियुक्त करावयाच्या कंत्राटी अभियंत्यांकडून जोडपत्र ३ प्रमाणे स्टॅम्प पेपरवर बंधपत्र लिहून घेण्याची वैयक्तिक जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांची राहील.

१०) **रजा:-** कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांना त्यांच्या वार्षिक नियुक्ती कालावधीत १० नैमित्तिक रजा व १५ वैद्यकीय रजा अनुज्ञेय राहतील.

११) **कर्तव्ये व जबाबदा-या :**

(अ) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद य अधिपत्याखाली काम करणे,

(ब) ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची अंदाज पत्रके व आराखडे तयार करणे,

(क) निविदा तयार करणे, योजनांच्या कामाचे संनियंत्रण करणे,

(ड) योजनांच्या प्रगतीचा आराखडा तयार करणे, त्याप्रमाणे कार्यवाही करणे व केलेल कार्यवाहीचा प्रगती अहवाल कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यां सादर करणे.

(ई) ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिका जिल्हा परिषद व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परि यांच्याकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारी कामे करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळा उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०६०४१४२९५३००२८ असा आहे. हा आदे डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Gitte

Digitally signed by Kiran Gitte
DN: CN = Kiran Gitte, C = IN, S = Maharashtra, O = ALL INDIA SERVICE, OU = IAS
Date: 2014.06.05 17:05:59 +05'30'

**(किरण गित्ते)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
२) मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
३) विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व)
४) विभागीय आयुक्त (सर्व)
५) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
६) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
७) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
९) सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१०) सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद

११) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१२) महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१३) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१४) उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
१५) सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१६) सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१७) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९) मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
२०) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
२१) सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२२) सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
२३) निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

## जोडपत्र -१

(शासन निर्णय क्र. ग्रापाधो १११२/ प्र. क्र. १६७/पापु-०७, दिनांक- ०४ जून, २०१४ चे जोडपत्र)

### PRESCRIBED PROFORMA

**Applied for the Post Name: ---------------------------------------**

1) Full Name:-

2) a) Date of birth - b) Age as on date of advertisement :

3) Place of birth-

4) Educational Qualification (From 10th onwards)

| Sr. No. | Name of the qualifying exam | Year of passing | Percentage of marks obtained |
|---|---|---|---|

5) Languages Known ( Spoken):-

6) Languages Known ( Written):-

7) Address for communication with pin code/E. mail:-

8) Tel. No.- (Residence & Office)

9) Experience in years :-

| Sr. No. | Name of the organization | Duration of work in years | Job responsibilities |
|---|---|---|---|

10) Details of employment in chronological order: -

11) Nature of present employment: - (contract /permanent)

12) Present total emoluments: -

**Date: -**

**Place: -** **(Signature and Name)**

**Note:-**

1. The applications should reach respective Chief Executive Officer of Zilha Parishad by up to 5.00 P.M. (By post or through hand delivery only, electronic applications will not be considered.)
2. The above mentioned age is relaxable in case of deserving candidates.
3. Knowledge and fluency (both written and spoken) in Marathi and English language is essential.
4. All the candidates of the above positions should be conversant with computer operations.
5. Please attach attested copies of the relevant documents, the application may not be considered if not supported by relevant documents.
6. Applications which are not in prescribed form will be rejected

## जोडपत्र -२

(शासन निर्णय क्र. ग्रापाधो १११२/ प्र. क्र. १६७/पापु-०७, दिनांक- ०४ जून, २०१४ चे जोडपत्र)

कनिष्ठ कंत्राटी अभियंता पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जांच्या छाननीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांची निवड करण्यासाठी खालील प्रमाणे गुणदान पद्धती अवलंबिण्यात यावी-

| बाब | सर्वसाधारण शैक्षणिक पात्रता (Basic Qualification) | उच्च शैक्षणिक पात्रता (Higher Qualification) | शासकीय सेवेतील अनुभव (Experience in Govt) | विभागवार ज्ञान (Sectoral Knowledge) | संगणक ज्ञान (Computer Knowledge) | व्यक्तिमत्व (Personality) | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण गुण | ४० | १० | १० | १० | ०५ | ०५ | ८० |
| उमेदवारास देण्यात आलेले गुण | | | | | | | |

**(अ)** **सर्वसाधारण पात्रतेअंतर्गत द्यावयाचे गुण**-:
सर्वसाधारण शैक्षणिक पात्रतेकरीता गुण देताना खालील सूत्राचा अवलंब करावा
**उमेदवारास द्यावयाचे गुण**= ४० X सर्वसाधारण शैक्षणिक पात्रतेत प्राप्त गुणांची टक्केवारी.

**(आ)** **उच्च शैक्षणिक पात्रतेअंतर्गत द्यावयाचे गुण**= उच्च शैक्षणिक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारास पूर्ण गुण देण्यात यावेत.

**(इ)** **शासकीय सेवेतील अनुभवावर द्यावयाचे गुण**= शासकीय सेवेतील अनुभवाकरिता गुण देताना खालील पद्धती वापरावी.
**उमेदवारास द्यावयाचे गुण**=
(१) शासकीय अनुभव ६ महीने ते १ वर्ष- २ गुण
(२) शासकीय अनुभव १ वर्ष ते २ वर्षे- ४ गुण
(३) शासकीय अनुभव २ वर्षे ते ५ वर्षे- ७ गुण
(४) शासकीय अनुभव ५ वर्षांहून अधिक- १० गुण

**(ई) विभागवार ज्ञान, संगणक ज्ञान व व्यक्तिमत्व यावरील गुण मुलाखतीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पडताळणी करून द्यावयाचे आहेत.**

**जोडपत्र-३**

(शासन निर्णय क्र. ग्रापाधो १११२/ प्र. क्र. १६७/पापु-०७, दिनांक- ०४ जून, २०१४ चे जोडपत्र)

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नियुक्ती/ पुनर्नियुक्ती करावयाच्या कनिष्ठ कंत्राटी अभियंत्यांकडून लिहून घ्यावयाच्या करारनाम्याचा मसुदा**

Z.P. ------------------

No.

Chief Executive Officer

Zilha Parishad--------

Dated: - / /

**Subject:-** Contractual assignment as ---------------- District----------

**1.** Set out below are the terms and conditions under which **Shri./Smt.____________** is given this contractual assignment. His/her services on contract basis are presently required for Z.P. ------ Dist. ------------

**2.** This Contractual assignment is given for a period of 11 months from the **date ______________________**

**3.** Any decision taken on the basis of inputs pertaining to specific expertise possessed by the assignee appointed on contract, if results into a financial loss to the government, which if proved to have been caused due to lack of application of mind or dereliction of duty by him/her, the CEO, ZP shall have right to fix the responsibility upon him/her and recover the loss from him/her.

**4. This contractual period of 11 months of the assignment may be shortened or terminated any time during this period depending upon the need and progress of the work.** In the event of the termination of this assignment before the agreed period, s/he will be paid for the service rendered by him/her for carrying out the assignment till the date of termination of the contract and s/he will hand over his/her charge to the person authorized by CEO, Zilha Parishad along with all the information and documentation possessed or gathered by him/her while rendering the service under this contract.

**5.** His/her services will be exclusively utilized for Rural Water Supply Schemes in District----under overall superintendence, control and guidance of CEO, ZP, ___________________and Executive Engineer, RWS, Zilha Parishad ------ will have daily control over his/her work. He/she will perform his/her duties as per job chart given by Executive Engineer, RWS, Zilha Parishad, and the State project management unit and shall be subject to performance appraisal . However, CEO, Zilha Parishad may assign him/her any other function, responsibility or task as regards the overall implementation of Water Supply and Sanitation Project in any part of the State.

**6.** Chief Executive Officer, ZP will pay him/her directly a fixed consolidated remuneration of Rs.---------- per month along with admissible allowances during the contract period at the end of every month or thereof on his/her satisfactory performance of the assignment for that month. The above rate is subject to deduction of any taxes, which are required to be lawfully deducted from his/her, remuneration. No other remuneration, compensation or benefits are admissible to him/her for this contractual assignment.

**7.** If he/she desires to leave the assignment for any reason before the termination of contractual period, he/she will give **three months**° notice or deposit equivalent remuneration in lieu of notice.

**8.** All materials produced or acquired under the terms of this agreement written graphic, film, and magnetic tape or otherwise, shall remain the property of DWSM Cell, Zilha Parishad. Water Supply and Sanitation Department retains the exclusive right to publish or dissemination reports arising from such materials. His/her responsibility and duties in this paragraph shall continue, notwithstanding the termination of this contract for the execution of its other provisions

**9.** He/she also agrees that all knowledge and information not within the public domain which may be acquired during the carrying out of this contract, shall be for all the times and for all purposes, regarded as strictly confidential and held in confidence and shall not be directly or indirectly disclosed to any person whatsoever, except with the prior approval of Water Supply and Sanitation Department, Government of Maharashtra.

**10. Clear understanding is given that, this is purely a contractual engagement and it is not a permanent job with Government of Maharashtra..**

**11. Shri. /Smt.** ------------------- here by gives an undertaking that he/she will continue to serve the Rural Water Supply Department of the ZP for the said period. His/her consolidated pay for a period of one month will be retained by the DWSM Cell of Zilha Parishad and shall be paid to him/her after the completion of the said period. It will be forfeited if he/she leaves the Project before the completion of said period.

**12.** Shri. /Smt. ------------------------will be given an Identity Card duly signed by Executive Engineer, RWS, ZP after his/her contractual assignment and he/she hereby agrees that the said Identity Card shall be returned to Executive Engineer, RWS, ZP after his /her contractual period comes to an end or upon termination of his /her services whichever happens earlier, failing which his/her consolidated pay for a period of one month will be retained by the Chief Executive Officer, ZP. It will be forfeited if he/she leaves the Project without returning I-Card.

**13. Shri/ Smt. ---------------------- hereby agrees and gives undertaking that, he/ she shall not put along claim whatsoever to regularize her/him in a permanent service.**

**14. Shri./Smt.** ------------------ hereby agrees to carry out his/her assignment for the Zilha Parishad on above terms and conditions and assures to give his /her services, accordingly for the acceptance of which, he/she has put his/her signature below:

I agree and accept the assignment on above terms and conditions.

Name in full-

Signature-

Place-

Date-

**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणी, त्रयस्थ तांत्रिक परिक्षण व देखभाल दुरुस्तीबाबत सुधारीत मार्गदर्शक सुचना.**

## महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-०७**

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: ०९ जुलै, २०१४

<u>वाचा :-</u>

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापापु-१०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७, दि.२७ जुलै,२०००
२) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापापु-१००१/प्र.क्र.१९०/पापु-०७, दि.३ सप्टेंबर,२००१
३) **शासन परिपत्रक क्रमांकः** ग्रापापु-१००२/प्र.क्र.५३२/पापु-०७, दि.२३ मार्च,२००२
४) **शासन परिपत्रक क्रमांकः** ग्रापापु-१००६/प्र.क्र.३४३/पापु-०७, दि.२४ नोव्हेंबर,२००६
५) **शासन शुध्दीपत्रक क्रमांकः** ग्रापापु-१००६/प्र.क्र.३४३/पापु-०७, दि.२५ जानेवारी,२००७
६) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापापु-१००७/प्र.क्र.२४३/पापु-०७, दि.४ फेब्रुवारी,२००८
७) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४/पापु-०७, दि.१ ऑगस्ट,२००९
८) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-११०९/प्र.क्र.११५/पापु-०७, दि.९ सप्टेंबर,२००९
९) **राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाबाबतच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना**
१०) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दि.१७ मार्च,२०१०
११) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१२२/पापु-०७, दि.१५ मे,२०१०
१२) **शासन शुध्दीपत्रक क्रमांकः** ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दि.३० ऑगस्ट,२०१०
१३) **शासन शुध्दीपत्रक क्रमांकः** ग्रापाधो-११११/प्र.क्र.९०/पापु-०७, दि.४ जून,२०११
१४) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१२१३/प्र.क्र.३५/पापु-०७, दि.१६ जुलै,२०१३
१५) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.५२/पापु-०७, दि.९ ऑक्टोबर,२०१३
१६) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११३/प्र.क्र.६०/पापु-०७, दि.०१ जानेवारी,२०१४
१७) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११३/प्र.क्र.१५६/पापु-०७, दि.२२ जानेवारी,२०१४

<u>**प्रस्तावना :-**</u>

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने मागणी आधारित लोकसहभागाचे लोकाभिमुख धोरण स्विकारले आहे. सन २००९-१० पासून या कार्यक्रमाचे रुपांतर

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (National Rural Drinking Water Programme-NRDWP) असे करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी संदर्भाधिन क्र.१० येथील शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

पाणी पुरवठा योजना मंजूर करुन अंमलबजावणी करण्यापुर्वी अशा योजनांची योग्य प्रकारे छाननी करुन, तांत्रिक मान्यतेमध्ये काही त्रुटी असल्यास त्या फेर तांत्रिक मान्यतेसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांकडे परत पाठविण्यात येतात. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे (प्रामुख्याने ग्रामपंचायतींकडे) पुरेसे मनुष्यबळ अथवा तांत्रिक/प्रशासकीय क्षमता नसल्यामुळे बऱ्याच पाणी पुरवठा योजनांची योग्य प्रकारे छाननी न होता, त्यांना मान्यता दिली जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतंर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्याचे आर्थिक व भौतिक प्रगतीचे संनियंत्रण करणे ही पुर्णत: जबाबदारी जिल्हा परिषदांची आहे. तथापि, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे तसेच अंमलबजावणीचे अधिकार जिल्हा परिषदांना पुरेश्या प्रमाणात नसल्यामुळे जिल्हा परिषदेस जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांसाठी आर्थिक व भौतिक प्रगतीचे संनियंत्रण करणे शक्य होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद स्तरावर देखील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी केली जावी, अशा स्वरुपाची मागणी विविध जिल्हा परिषदांकडून शासनास प्राप्त होत आहे.

विभागाने गत दोन वर्षात पारीत केलेल्या महत्त्वपुर्ण शासन निर्णयांपैकी संदर्भाधीन क्रमांक १५ येथील दरडोई खर्चाचे सुधारीत धोरण, संदर्भाधीन क्रमांक १६ येथील सुधारीत लोकवर्गणीचे धोरण व संदर्भाधीन क्रमांक १७ येथील हागणदारी मुक्तीचे सुधारीत धोरण यामुळे ग्रामीण भागात पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी येणाऱ्या बहुतांश अडचणी दुर झाल्या असून, ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनांना गती प्राप्त होत आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा विभागस्तरावर आढावा घेतला असता असेही निदर्शनास आले आहे की, लोकवर्गणी, समितीचा अत्यल्प प्रतिसाद, योजनेसंबंधी तक्रारी, योजनेचे लेखापरिक्षण इ.कारणांमुळे सुमारे ५०० हून अधिक योजना तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी रखडलेल्या आहेत. त्यामुळे अशा योजनांचे व भविष्यात घ्यावयाच्या योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परिक्षण केल्यास पाणी पुरवठा योजना विहित कालावधीत पुर्ण होऊ शकतील व या योजनांमध्ये होत असलेल्या अनियमिततेस आळा बसु शकेल. केंद्र शासनामार्फत नागरी भागाकरीता राबविण्यात येत असलेल्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण (JNNURM) कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांसाठी केंद्र शासनामार्फत त्रयस्थ तांत्रिक परिक्षण (Third Party Technical Inspection) अनिवार्य केले आहे. त्याच धर्तीवर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करणे आवश्यक वाटते.

राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा विभागस्तरावर आढावा घेतला असता असेही निदर्शनास आले आहे की, योजना पुर्णत्वानंतर कंत्राटदाराने करावयाचा एक वर्षाच्या देखभाल दुरुस्तीनंतर योजना संबंधित अंमलबजावणी यंत्रणेकडे/स्थानिक स्वराज्य संस्थेकडे हस्तांतरीत केली जाते. परंतु, हस्तांतरणानंतर योजनेची उचित देखभाल व दुरुस्ती अंमलबजावणी यंत्रणा/स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत केली जात नाही. त्यामुळे कार्यान्वीत असलेल्या योजना बंद पडतात अथवा त्यामध्ये बिघाड निर्माण होतात.

वरील परिस्थिती विचारात घेऊन मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक ०२ जुलै, २०१४ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणी, त्रयस्थ तांत्रिक परिक्षण व देखभाल दुरुस्तीबाबत सुधारीत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेवून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणी,त्रयस्थ तांत्रिक परिक्षण व देखभाल दुरुस्ती बाबत पुढील प्रमाणे सुधारीत मार्गदर्शक सूचना पारीत करण्यात येत आहेत.

१) **तांत्रिक मान्यतेचे अधिकार :-** खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे तांत्रिक मान्यतेचे अधिकार संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | तांत्रिक मान्यतेचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु.२.०० कोटी पर्यंत | रु.२.०० कोटी ते रु.७.५० कोटी पर्यंत | रु.७.५० कोटी वरील सर्व |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु.२.०० कोटी पर्यंत | रु.२.०० कोटी ते रु.७.५० कोटी पर्यंत | रु.७.५० कोटी वरील सर्व |

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे पद तांत्रिक स्वरुपाचे नसल्याने संदर्भाधिन क्र.६ येथील शासन निर्णयान्वये सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना रु.५.०० कोटीवरील योजनांसाठी दिलेले तांत्रिक मान्यतेचे अधिकार या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहेत.

संबंधित तांत्रिक प्राधिकरणाकडे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या तांत्रिक मान्यतेचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करणे आवश्यक राहील.

२) **प्रशासकीय मान्यतेचे अधिकार:-** खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे प्रशासकीय मान्यतेचे अधिकार संबंधित प्राधिकरणास प्रदान करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | प्रशासकीय मान्यतेचे अधिकार (दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या योजनांसाठी) | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामसभा | जिल्हा जलव्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (शासन) |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु.५०.०० लक्ष पर्यंत | रु.५०.०० लक्ष ते रु.७.५० कोटी पर्यंत | रु.७.५० कोटी वरील सर्व |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | -- | रु.७.५० कोटी पर्यंत | रु.७.५० कोटी वरील सर्व |

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना निधीच्या उपलब्धतेनुसार संबंधित यंत्रणेने प्रशासकीय मान्यता द्यावी. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या राज्यस्तरीय योजना मंजुरी समितीची मान्यता प्राप्त वार्षिक कृती आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या योजनाच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधून राबविण्यात येतील.

ग्रामसभेने प्रशासकीय मान्यता दिलेल्या योजनांच्या बाबतीत प्रशासकीय मान्यतेचे आदेश ग्रामसेवक यांनी निर्गमित करावेत. तर जिल्हा जल व्यवस्थापन समितीने प्रशासकीय मान्यता दिलेल्या योजनांच्या बाबतीत प्रशासकीय मान्यतेचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी निर्गमित करावेत. रु.७.५० कोटी पेक्षा अधिक रक्कमेच्या व दरडोई खर्चाच्या निकषात न बसणाऱ्या सर्व योजनांचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मार्फत प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात यावेत.

**ग्रामीण पाणी पुरवठा योजनेस सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतरच प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करतांना त्यासोबत योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR), अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेच्या आदेशाची प्रत सादर करावी.**

३) **योजनेची क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणी :-** खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा योजना अंमलबजावणीचे अधिकार संबंधित प्राधिकरणास प्रदान करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | अंमलबजावणीचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती | जिल्हा परिषद | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु.२.०० कोटी पर्यंत | रु.२.०० कोटी ते रु.७.५० कोटी पर्यंत | रु.७.५० कोटी वरील सर्व |

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | अंमलबजावणीचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती | जिल्हा परिषद | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | -- | रु.७.५० कोटी पर्यंत | रु.७.५० कोटी वरील सर्व |

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करत असतांना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने ई-निविदा प्रक्रियेचा व गरजेनुसार सर्वसाधारण निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा.

जिल्हा परिषदेस रु.५.०० ते रु.७.५० कोटीपर्यंतच्या योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करावयाची असल्यास जिल्हा परिषदेने त्याबाबतचा ठराव करणे आवश्यक राहील.

४) **त्रयस्थ तांत्रिक परिक्षण:-** खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करणे बंधनकारक राहील.

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | त्रयस्थ तांत्रिक परिक्षण |
|---|---|---|
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करणे अनिवार्य |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करणे अनिवार्य |

योजनेच्या भौतिक प्रगतीचा अहवाल संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यास वेळोवेळी सादर करते समयी त्रयस्थ तांत्रिक परिक्षण अहवाल सादर करणे अनिवार्य राहील. त्रयस्थ तांत्रिक परिक्षण कोणत्या यंत्रणामार्फत करावयाचे आहे तसेच त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाबाबतची सविस्तर कार्यपद्धती याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

५) **देखभाल व दुरुस्ती:- सध्या लागू असलेल्या शासन निर्णय दिनांक १७ मार्च, २०१० नुसार योजना पूर्ण झाल्यानंतर किमान १ वर्ष ही योजना चालवणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.** त्यानंतर योजनेच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबंधीत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची राहील. याव्यतिरिक्त खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती करण्याचा पर्याय योजना ज्या यंत्रणेकडे हस्तांतरित करण्यात आली आहे त्या यंत्रणेस स्वीकारता येईल.

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | देखभाल दुरुस्ती |
|---|---|---|
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | संबंधित कंत्राटदारामार्फत योजना पुर्ण झाल्यानंतर ३ ते ५ वर्ष |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | संबंधित कंत्राटदारामार्फत योजना पुर्ण झाल्यानंतर ३ ते ५ वर्ष |

कंत्राटदारामार्फत योजना पूर्णत्वानंतर करावयाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च पाणी पुरवठा योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालात तसेच योजनेच्या भांडवली खर्चात समविष्ट करता येणार नाही. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीबाबत सविस्तर निर्देश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

या विभागामार्फत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणी,त्रयस्थ तांत्रिक परिक्षण व देखभाल दुरुस्ती बाबत निर्गमित केलेले यापूर्वीचे सर्व शासन निर्णय/ शुद्धीपत्रके/ परिपत्रके या शासन निर्णयानुसार अधिक्रमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय हा नियोजन विभागाने अनौपचारिक संदर्भ क्रमांक १५५/१४४३, दिनांक २९/०५/२०१४ व वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३५३/व्यय-३, दिनांक १८/०६/२०१४ अन्वये दिलेल्या सहमती नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०७०९१५३२४४६५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Kumar

Digitally signed by Rajesh Kumar
DN: CN = Rajesh Kumar, C = IN, S = Maharashtra, O = ALL INDIA SERVICE, OU = IAS
Date: 2014.07.10 13:18:08 +05'30'

**(राजेश कुमार)**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उप मुख्यमंत्री यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधिमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२.संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे.
१३.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१४.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१५.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१६.मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१७.अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१८.कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१९.कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
२०.मंत्रालयीन इतर सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेली सर्व कार्यालये.
२१.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने.
२२.निवडनस्ती, कार्यासन पापु-०७.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या सुधारित निकषाच्या १०० टक्केहून अधिक दरडोई खर्च असणाऱ्या योजनांना मान्यता देण्यासाठी उच्चाधिकार समिती स्थापन करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
## शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११३/प्र.क्र.१६७/पापु-०७

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: ०१ ऑगस्ट, २०१४

**वाचा :**

**१) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१३.**

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक ११ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार दरडोई खर्चाचे सुधारित निकष लागू करण्यास संदर्भाधीन दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. मा.मंत्रीमंडळाच्या निर्देशानुसार दरडोई खर्चाच्या सुधारित निकषांच्या १०० टक्क्यांहून अधिक दरडोई खर्च असणाऱ्या योजनांना मान्यता देण्यासाठी मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखाली अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव (नियोजन विभाग), अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव (वित्त विभाग) व प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचा समावेश असणारी उच्चाधिकार समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी संदर्भाधीन दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरडोई खर्चाच्या सुधारित निकषांच्या १०० टक्क्यांहून अधिक दरडोई खर्च असणाऱ्या योजनांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी खालील प्रमाणे उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात येत आहे

**उच्चाधिकार समिती**

| अ.क्र. | पदनाम | विभाग | समिती |
|---|---|---|---|
| १ | मा.मंत्री | पाणी पुरवठा व स्वच्छता | अध्यक्ष |
| २ | अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव | नियोजन विभाग | सदस्य |
| ३ | अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव | वित्त विभाग | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| ५ | मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य सचिव |

मा.मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी निश्चित करण्यात आलेल्या दरडोई खर्चाच्या १०० टक्क्यांपेक्षा जास्त खर्चाच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा निर्णय या समितीद्वारे घेण्यात येईल.

मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी यांनी शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी प्राप्त झालेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रस्तावांची छाननी करावी. मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी यांनी उच्चाधिकार समितीच्या अध्यक्षांकडून बैठकीसाठी दिनांक व वेळ प्राप्त करून घ्यावी व त्याप्रमाणे बैठकांचे आयोजन करावे.

उच्चाधिकार समितीमध्ये झालेल्या निर्णयानुसार कार्यवाही करणे, बैठकांचे इतिवृत्त तयार करणे, बैठकीतील निर्णयानुसार मंजूर झालेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्याची जबाबदारी उच्चाधिकार समितीचे सदस्य सचिव म्हणून मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांची राहील. उच्चाधिकार समितीच्या सर्व आदेशांचे पालन करणे सदस्य सचिव यांना बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८०११३२३५२२३२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Gitte

Digitally signed by Kiran Gitte
DN: CN = Kiran Gitte, C = IN, S = Maharashtra, O = ALL INDIA SERVICE, OU = IAS
Date: 2014.08.01 17:45:04 +05'30'

**किरण गित्ते**

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
२. मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
३. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
४. मा.मंत्री, (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
५. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
६. मा.राज्यमंत्री, (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
७. मा.विधानसभा/ विधानपरिषद सदस्य (सर्व)
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

१०. **आयुक्त**, महानगरपालिका (सर्व)
११. **संचालक**, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१२. **मुख्य कार्यकारी** अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)
१३. **संचालक**, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१४. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१५. प्रादेशिक उपसंचालक (सर्व), भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.
१६. मुख्याधिकारी, नगरपरिषदा (सर्व)
१७. अधीक्षक अभियंता (सर्व)
१८. कार्यकारी अभियंता (सर्व)
१९. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
२०. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
२१. मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
२२. गटविकास अधिकारी, पंचायत समित्या (सर्व)
२३. मंत्रालयीन सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेली सर्व कार्यालये.
२४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.
२५. निवडनस्ती (कार्यासन, पापु-०७)

**शहरालगतच्या ग्रामपंचायती, वाड्या, वस्त्यांमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना**

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## शासन निर्णय क्रमांकः निशयो-१४१३/प्र.क्र.८८/पापु-०७

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख: ११ सप्टेंबर, २०१४.

<u>वाचा :</u>

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापापु-१०९९/प्र.क्र.३३८/पापु-०७, दिनांक २७ जुलै, २०००
२) **शासन निर्णय क्रमांकः** नापापु-१०००/प्र.क्र.४१९/पापु-२२, दिनांक २७ सप्टेंबर,२०००
३) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४ (अ)/पापु-०७, दिनांक १७ मार्च,२०१०
४) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१३०(II)/पापु-०७, दिनांक ७ जून,२०१२
५) **केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना (NRDWP GUIDELINES)**
६) **केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता मंत्रालयाचे अर्ध शासकीय पत्र क्रमांकः** F-11011/31/2013/Water-II, Dated 22nd July,2013

<u>प्रस्तावना :</u>

आर्थिक वर्ष सन २००९-२०१० पासून केंद्र शासनाने वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे रुपांतर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (National Rural Drinking Water Programme-NRDWP) असे केले आहे. राज्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याचे सुरक्षित व पुरेसे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मागणी आधारीत लोकसहभागाचे लोकाभिमुख धोरण स्विकारले आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरीता संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये सर्व समावेशक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाने संदर्भ क्र.६ येथील पत्रान्वये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागासाठी दरडोई दरदिवशी ४० लिटरप्रमाणे पाणी पुरवठा करण्यास प्रथम प्राधान्य देण्याचे व ग्रामीण भागात दरडोई दरदिवशी किमान ४० लिटरप्रमाणे पाणी पुरवठा होईल याची खात्री करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच दरडोई दरदिवशी किमान ४० लिटरचा पाणी पुरवठा केल्यानंतरच दरडोई दरदिवशी ४० ते ५५ लिटर अथवा अधिक पाणी पुरवठा हे उद्दिष्ट गाठण्याचे सुचित केले आहे.

संदर्भाधिन क्र.४ येथील शासन निर्णयान्वये निम-शहरी ग्रामपंचायती/वाड्या/वस्त्यांमध्ये लगतच्या शहरी निकषानुसार पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

राज्यातील महानगरे अथवा शहरांच्या लगत असणाऱ्या ग्रामपंचायती/वाड्या/वस्त्यांचा भाग हा ग्रामीण भागच असल्याने या ग्रामीण भागामध्ये देखील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येते. तथापि, शहरे/महानगरे यांच्या लगत असणाऱ्या ग्रामीण भागात मल:निस्सारण योजना अस्तित्वात नसल्याने, राज्य शासनावर येत असलेला अधिकचा आर्थिक भार तसेच लगतच्या शहरी निकषानुसार योजना राबविण्याची संबंधित ग्रामपंचायत/वाडी/वस्तीची नसलेली आर्थिक व तांत्रिक कुवत या बाबींचा विचार करता संदर्भाधिन क्र.४ येथील शासन निर्णयान्वये पारीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा पुनर्विचार करणे गरजेचे झालेले आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत शहरालगतच्या ग्रामपंचायती/वाड्या/वस्त्यांमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील शहरालगत असलेल्या निम-शहरी (Peri Urban) ग्रामपंचायती/वाड्या/वस्त्या यांना लगतच्या शहरी निकषानुसार ग्रामीण पाणी पुरवठा सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहेत.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत शहरालगतच्या ग्रामपंचायती, वाड्या, वस्त्यांमध्ये दरडोई दरदिवशी अधिकतम ७० लिटर पर्यंतच्या सुधारीत/नवीन पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागासाठी दरडोई दरदिवशी ४० लिटर क्षमतेने पाणी पुरवठा करण्यास प्राधान्य देण्याचे केंद्र शासनाने निर्देशित केलेले असल्याने राज्यातील शहरालगत असलेल्या ग्रामपंचायती, वाड्या व वस्त्यांमध्ये दरडोई दरदिवशी किमान ४० लिटर क्षमतेने पाणी पुरवठा होत असल्याची खात्री संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करावी.

शहरालगतच्या ग्रामपंचायत, वाडी, वस्तीमध्ये दरडोई दरदिवशी अधिकतम ७० लिटर क्षमतेपर्यंतच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना घेण्यासाठी या ग्रामपंचायती, वाड्या व वस्त्या नगरपालिकेच्या व महानगरपालिकेच्या सीमारेषेपासून १० कि.मी.च्या परिघातील असणे आवश्यक आहे.

वरील अट पुर्ण करणाऱ्या सर्व ग्रामपंचायती, वाड्या, वस्त्या या शहरालगतच्या ग्रामपंचायती, वाड्या, वस्त्या समजण्यात येतील. शहरालगतच्या ग्रामपंचायती, वाडया, वस्त्या या पाणी पुरवठ्याच्या दृष्टीकोनातून निश्चित करण्यासाठी तसेच त्यांचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या

अध्यक्षतेखालील समिती रद्द करुन, ही समिती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| **१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद** | - | **अध्यक्ष** |
| २) संबंधित उपायुक्त, महानगरपालिका/मुख्याधिकारी, नगर परिषद | - | सदस्य |
| ३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता / ग्रामपंचायत | - | सदस्य |
| ४) सहाय्यक/उप संचालक (नगर रचना) | - | सदस्य |
| ५) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | - | सदस्य |
| ६) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा | - | सदस्य |
| ७) संबंधित कार्यकारी अभियंता, ग्रापापु, जिल्हा परिषद | - | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीचे अध्यक्ष वरील सदस्यांखेरीज समितीच्या बैठकीस आवश्यकता भासल्यास संबंधित विषयातील तज्ञ व्यक्ती/अधिकारी यांना विशेष निमंत्रित सदस्य म्हणून आमंत्रित करु शकतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी शहरालगतच्या ग्रामपंचायती, वाड्या व वस्त्या यांच्या पाणी पुरवठा योजनांच्या सविस्तर प्रकल्प अहवालाची तपासणी करावी, तसेच प्रस्तावित योजनांचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या कृती आराखड्यामध्ये समावेश असेल याची दक्षता घ्यावी. या योजनांच्या अंमलबजावणीसाठी राज्य हिश्श्याच्या निधीची तरतूद करण्याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करावी. शहरालगतच्या ग्रामपंचायती, वाड्या व वस्त्या यांच्या पाणी पुरवठा योजनांचा प्रकल्प अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फतच सादर करणे बंधनकारक असून योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान योजनेचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

शहरालगतच्या ग्रामपंचायती, वाड्या व वस्त्यांमध्ये पाणी पुरवठा व्यवस्था निर्माण करण्यासाठी तयार करावयाच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये खालील बाबींचा प्रामुख्याने समावेश असावा :

१) पिण्याच्या पाण्यासाठी प्रस्तावित पाण्याचा स्त्रोत व उपलब्ध पाणी याचा तपशील.
२) लगतची स्थानिक स्वराज्य संस्था/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत ठोक पाणी पुरवठा करण्याचा प्रस्ताव असल्यास त्याचे विवेचन.
३) ग्राहक सर्व्हेक्षण
४) ग्राहक तक्रार निवारण पध्दत
५) योजनेच्या देखभाल-दुरुस्तीचा तपशील

शहरालगतच्या ग्रामपंचायती, वाड्या व वस्त्या यांच्याकडून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे पाणी पुरवठा योजनांच्या मागणीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर (१) योजनांचा प्राधान्यक्रम, (२) योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता, (३) योजनांची अंमलबजावणी, (४) तांत्रिक सहाय्य व संनियंत्रण, (५) योजनांची देखभाल व दुरुस्ती, (६) योजनांचे नियोजन व अंमबजावणीची कार्यपध्दती, (७)